# बृहन्मुंबई महानगरपालिका

## गणेशोत्सव - २०२० साजरा करताना विसर्जनादरम्यान नागरिकांनी पालन करावयाच्या आवश्यक सूचना

**कोविड-१९ साथ रोगाच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता यावर्षीचा गणेशोत्सव अत्यंत साध्या पध्दतीने साजरा करण्याबाबतचे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका व शासनस्तरावरुन वेळोवेळी नागरिकांना करण्यात आले आहे. या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी गणेशोत्सव - २०२० साजरा करताना विसर्जनादरम्यान पालन करावयाच्या आवश्यक सूचना.**

- घरगुती गणेशोत्सव साजरा करणा-या भाविकांनी गणेशमूर्तीचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी बादलीत किंवा ड्रममध्ये करावे.
- मुंबई शहरात एकूण ७० नैसर्गिक विसर्जन स्थळे आहेत. या नैसर्गिक विसर्जन स्थळांवर नागरिकांना किंवा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांना थेट पाण्यात जावून मूर्ती विसर्जन करण्यास प्रतिबंध आहे.
- नैसर्गिक विसर्जन स्थळांवर महापालिकेद्वारे अतिरिक्त मनुष्यबळ देवून मूर्ती संकलनाची शिस्तबध्द व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
- नैसर्गिक विसर्जन स्थळांवरील गर्दी कमी होण्यासाठी महापालिकेच्या २४ विभागांमध्ये सुमारे १७० कृत्रिम तलाव देखील निर्माण करण्यात आले आहेत. कृत्रिम तलावालगत राहणा-या भाविकांना नैसर्गिक विसर्जन स्थळांवर जाण्यास मनाई असल्याने सदर कृत्रिम तलावाचा वापर लगतच्या भाविकांनी करणे बंधनकारक आहे.
- महापालिकेच्या प्रत्येक विभागांतर्गत ७ ते ८ गणेशमूर्ती संकलन केंद्रे निर्माण करण्यात आली आहेत. त्याची माहिती तसेच कृत्रिम तलावांची माहिती पत्त्यासह तसेच गुगल लोकेशनसह महापालिकेच्या https://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर "नवीन संदेश/whats new section" येथे उपलब्ध आहे.
- प्रतिबंधित क्षेत्र (containment zone) मध्ये असणा-या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मूर्तीचे विसर्जन मंडपातच करावयाचे आहे किंवा विसर्जन पुढे ढकलावयाचे आहे. सिल्ड इमारतींमधील

(sealed building) गणेशमूर्तींचे विसर्जनासाठी घरीच व्यवस्था करावयाची आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

- मूर्ती संकलन केंद्रावर, कृत्रिम तलावांवर किंवा नैसर्गिक विसर्जन स्थळांवर उपलब्ध महापालिकेच्या व्यवस्थापनाकडे मूर्ती सूपूर्द करण्यापूर्वी मूर्तीची यथासांग पूजा व आरती घरीच किंवा मंडळाच्या मंडपातच करुन घेणे बंधनकारक आहे.
- महापालिकेने विशेष व्यवस्था म्हणून ट्रकवर टाक्या किंवा इतर व्यवस्था करुन फिरती विसर्जन स्थळे (mobile spots on wheel) निर्माण केलेली आहेत, त्याचाही लाभ भाविकांनी घ्यावा.
- २०२० गणेशोत्सवादरम्यान कोणत्याही मिरवणूकीस परवानगी नाही, याची देखील भाविकांनी नोंद घ्यावी.
- विसर्जना दरम्यान सामाजिक दूरीकरण अंतर (social distancing), मास्क/मुखपट्टी, सॅनिटायझर वापरणे इत्यादी आरोग्य संबंधित नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.